# वनपरिक्षेत्र अधिकारी कांदळवन संधारण घटक, नवी मुंबई यांचे कार्यालय

रो.हाऊस नं-26 भारत बिजली मार्ग. श्रीराम महाविद्यालय मागे, सेक्टर 04, ऐरोली नवी मुंबई 400 708

Email:rfomnm@gmail.com


विषय:- मौजे नेरूळ सेक्टर ६० मधील वृक्षतोडीच्या तक्रारीबाबत.

जा.क्र./ २५५ / २०१९-२०

नवी मुंबई दि. ३० / ०१ / २०२०

प्रति,

मा. उपवनसंरक्षक
कांदळवन कक्ष, मुंबई

संदर्भ :- आपलेकडील दिनांक १६.०१.२०२० रोजीचा E-mail संदेश

महोदय,

विषयांकित प्रकरणी आपले संदर्भिय E-mail व्दारे श्री. सूनिल अग्रवाल यांनी केलेल्या तक्रारीची वनपाल शहाबाज यांचेमार्फत दिनांक १८.०१.२०२० रोजी चौकशी केली असता नेरूळ येथील वनश्री बिल्डींग लगत सूरू असलेल्या नेरूळ सेक्टर ६० मधील पॉकेट डि व ई मध्ये मे. मिस्त्री कंन्ट्रक्शन कं.प्रा.लि. यांचेमार्फत सूबाभूळ, बोर प्रजातीच्या झाडांची तोड करून त्या झाडांची मुळे जे.सी.बी. च्या साहाय्याने उत्खनन करून जागेचे सपाटीकरणाचे काम सूरू असल्याचे स्थळावर दिसून आले आहे. यासंबंधी अधिक चौकशी केली असता वृक्षतोडीबाबत मे. मिस्त्री कंन्ट्रक्शन कं.प्रा.लि.यांना सिडकोकडील पत्र क्र. No.CIDCO/Hort/२०१९/२०१८ Date ११.१२.२०१९ अन्वये ७२४ झाडे तोडण्यास सिडकोमार्फत परवानगी देण्यांत आलेली आहे. त्याची प्रत सोबत संलग्न आहे. सदर तक्रारीत नमूद केलेले क्षेत्र हे अधिसूचित राखीव कांदळवन क्षेत्रात येत नाही. तसेच इतरत्र पाहणी केली असता कोणत्याही प्रकारच्या कांदळवन प्रजातीच्या वृक्षांची तोड झाल्याचे दिसून आलेले नाही.

**सदर क्षेत्राचे जी.पी.एस.रिडींग खालीलप्रमाणे आहे.**

N १९ ०० २९.२२, E ७३ ०० ४७.३१

N १९ ०० २५.७० E ७३ ००४४.५३

N १९ ०० २६.८१, E ७३ ०० ४३.०२

माहितीसाठी सविनय सादर.

उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई
आवक क्रमांक 246
दिनांक 4/02/2020

Steno: wetland
add in committee

(डि. एस. कुकडे)
**वनपरिक्षेत्र अधिकारी**
**कांदळवन संधारण घटक नवी**

प्रत :- मा. विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक यांना माहितीसाठी सविनय सादर

TIMES OF INDIA, MUMBAI 14/01/2020.







## Hacked trees put on trucks, carted away

A day after over 700 trees were cut in Navi Mumbai, even as a case is pending in the Supreme Court, the hacked trees were carted away by a truck on Monday. Green activists have shot letters to the state top cop regarding the "massacre" of the green cover

INS.